म. ग्रं. सं. ठाणें
विषय ३१व्य
सं. क्र. ~~५१०~~ ५१९

५०९

५०९

ले - वि. कृ. नेरूरकर
एन्. बी. प्रेस. माळवण
शके १८४५
कि. ३ आणे.

REFBK-0019492
REFBK-0019492

REFBK-0019492
REFBK-0019492

## ...न.

यापुढें वाचकांस सादर करण्यांत येत असलेल्या "सिंहगड-दर्शन" नांवाच्या चिमकुल्या काव्याला मी प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहावे अशी त्या काव्याचे कर्ते आणि 'प्रमोद' मासिकाचे उत्साही व नेटाचे संपादक रा. रा. वि. कृ. नेरूरकर यांनीं प्रेमाग्रहयुक्त इच्छा व्यक्त केल्यावरून मी हे चार शद्ब लिहीत आहें.

विद्यमान कवींतील एक चांगले कवि या नात्यानें रा. नेरूरकर हे बऱ्याच वर्षांपासून मराठी वाचकांच्या परिचयाचे आहेतच. महाराष्ट्रांतील बहुतेक प्रमुख मासिक पुस्तकांतून वेळोवेळीं त्यांच्या पुष्कळ कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. तेव्हां त्यांचा किंवा त्यांच्या काव्यरचनापद्धतीचा नव्यानें परिचय करून देण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. तथापि, ज्या प्रमाणें एकाद्या आचारसंपन्न कुटुंबांत रोजचेंच जेवण, नैवेद्याची लहानशीच ताटली व जेवणारी घरचीच कुटुंबांतील मंडळी असली तरी, भोजनास सुरवात करण्यापूर्वी कोणीतरी वडीलधाऱ्या माणसानें, लहानसें चतुष्कोनी मंडळ करून त्यावर नैवेद्याची ताटली ठेवून, 'सत्यं त्वर्तेन...., प्राणाय स्वाहा ....' इत्यादि मंत्रोच्चार करून यथासांग नैवेद्य दाखविल्यावर आणि 'हं! चला बसा आतां; लागा जेवायला' असें म्हटल्यावरच भोजनास सुरवात होते, त्याप्रमाणें श्रीजनताजनार्दनास काव्यनैवेद्य

समर्पण करण्यासाठीं कोणाकडून तरी अगोदर प्रस्तावनारूप अल्पविधि करविल्यावरच काव्यभोजनास प्रारंभ करण्याचा आचार अलिकडील "कवि-कुलांत" पडलेला दिसतो. त्यास अनुसरून मीही रा. नेरूरकर यांचा पुढील अल्पकाव्य-कृतिरूपी रुचिकर नैवेद्य, काव्य-रसिक अथवा काव्यरूपीच अशा श्रीजनताजनार्दनास समर्पण करण्याचा अल्पविधि मोठ्या आनंदानें करावयास लागतों.

काव्याच्या नांवावरूनच त्यांतील विषयाचा बोध सहज होण्यासारखा आहे. फर्ग्युसन कॉलेजांत विद्यार्थी या नात्यानें रहात असतां एका कार्तिकी एकादशीच्या दिवशीं "तानाजी रण-क्षेत्रीं सिंहगडीं" जाऊन त्याच्या दर्शनानें तो "महाएकादशीचा पुण्य-दिवस पुण्याचरणीं लावावा" अशी कवि व त्याची मित्रमंडळी यानां इच्छा होऊन ती मंडळी आदल्या दिवशीं (कार्तिक शु. दशमीस) संध्याकाळीं पुण्याहून पायीं निघाली व दुसऱ्या दिवशीं सिंहगडाचें 'दर्शन' करून सर्व मंडळी पुण्यास परत आली. हा साधा वृत्तांत रा. नेरूरकरांनीं थोडक्यांत चटकदार रीतीनें पुढील काव्यांत ग्रथित केला आहे. काव्याची चालही, त्याच्या विषयानुरूप, फटका, पोंवाडा वगैरे सारखी साधी व सहज मौजेनें म्हणतां येण्याजोगी त्यांनीं योजिली आहे.

तथापि अलीकडे कित्येक कवींत दिसून येणाऱ्या प्रवृत्तीप्रमाणें आपल्या विषयाला 'पोंवाड्या' चें स्वरूप निदान पोंवाड्याचें नांव तरी देण्याचा मोह रा. नेरूरकरांनां पडला नाहीं ही मोठी सुदैवाची गोष्ट होय. "सुदैवाची गोष्ट" असें म्हणण्याचें

कारण माझ्या मतें, खेड्यापाड्यांतील भोळ्याभाबड्या सामान्य जनतेच्या नित्य व निकट सहवासांत दीर्घकाल राहून, त्यांच्या आचारांविचारांचें, भाषणासरणीचें व मनोवृत्तींचें प्रत्यक्ष ज्ञान करून घेतल्या शिवाय, त्या सर्व गोष्टींशीं खऱ्या सहृदयतेनें तादात्म्य झाल्याशिवाय आणि मुख्यतः आपल्या कृतींत साधारण जनतेबद्दल मनापासून खरें प्रेम व कळकळ असल्याचें जगाच्या निदर्शनास आणून दिल्याशिवाय, केवळ 'शाहीर' ह्मणून घेण्याची हौस किंवा 'पोंवाडे' करण्याची नवी 'फॅशन' ह्मणून पोंवाडे रचणें खऱ्या कवित्वाच्या दृष्टीनें हास्यास्पद व आत्मवंचनाकारक आहे. केवळ शहरवासी किंवा शहरवजा परिस्थितींत व संस्कारांत ढलेल्या लोकांकडून खरे 'पोंवाडे' निर्माण होणें अशक्य आहे. ...तील Ballad च्या अनुकरणाची टूम ह्मणून किंवा ऐति...क कावितेच्या खोट्या अभिमानाचें नसतें स्तोम माजवून ...न्या पोंवाड्यांतील 'थू तुझ्या जिनगानीवर, 'सरजा रे', 'समशेर' 'बिजली', वगैरे शब्द वेळीं अवेळीं योजून केलेले पोंवाडे केवळ पोपटपंची होय. या बाबतींत, गाईचें सोंग आणणाऱ्या नकल्या मनुष्याच्या सर्वपरिचित गोष्टींतील तात्पर्य बरोबर लागू पडतें. गाईचें सोंग घेऊन दाखविणाऱ्या नकल्या मनुष्यानें गाईच्या सोंगाची बतावणी बरोबर केली आहे कीं नाही, याची परीक्षा करण्याचा खरा अधिकार केवळ बाह्य सोंगाच्या हुबेहुबपणावरच खूष होणाऱ्या पोषाकी अमीरउमरावांचा किंवा पांढरपेशांचा नाहीं तर गाईच्या स्वभावधर्माचें सूक्ष्म व प्रत्यक्ष ज्ञान असणाऱ्या एखाद्या चाणाक्ष धोंगड्या गुराख्याचाच आहे. त्यानें त्या नकल्या

माणसाच्या अंगावर बारीकसा खडा फेंकताच त्याचें खरें स्वरूप प्रगट झालें. कृत्रिम पोवाड्याचीही गत तशीच होते.

प्रस्तुत काव्य चित्रमकुलेंच असलें तरी, त्यांत निरनिराळ्या प्रसंगानुरूप स्वतःस्फूर्तीनें बदल पावणाऱ्या कवीच्या वृत्तींचा स्वाभाविक खरेपणा; आणि 'सफरी' चें वर्णन देतानां प्रसंगानुरूप लक्ष्यांत येणाऱ्या लहानमोठ्या गोष्टींच्या निरीक्षणानें कवीस सुचणाऱ्या कल्पना, उपमा इत्यादि किंवा त्याच्या मनांत उद्भूत झालेल्या विचारतरंगमाला यांचा सहजरम्यपणा हे दोन महत्वाचे काव्यगुण उत्कटपणें प्रतिबिंबित झाले आहेत. नमुन्यादाखल अशी कांहीं स्थलें खालीं दर्शवितों:- (१) ....

"लोभावि तानाजी-यश त्यापरि ह्मणुनि पाहिला सिंहगुप्त-
ते दिन गेले, स्मृतिनें आले विचार ते वदतों उघड" मंडळी
सिंहगड-वैभव 'स्मृतिगत', आणि त्या गडाच्या ज्या 'दर्शन'क शुखाचें वर्णन पुढें करावयाचें तेंही 'स्मृतिगत'! असा प्रस्तुत काव्यांतशी दुहेरी शोकोद्दीपक प्रसंग असल्याचा जो सूक्ष्म ध्वनि वरील ओळींत सहजगत्या साधला आहे, तो फार रम्य आहे यांत शंका नाहीं.

(२) **आतां कुठलें? आतां केवळ घेणें स्मृति-वर्णन-घुटके!**
मुग्ध शैशवावस्था, सुखद विद्यार्थीदशा आणि कॉलेजांतील शिक्षणाचे हितप्रद संस्कार यांच्या संबंधाचे सुखकारक आठवणीचावरील ओळीनें केलेला खेदपर्यवसायी समारोप सर्वसाधारण कविसंकेतानुरूप असला, तरी प्रस्तुत काव्यप्रसंगाला धरून असल्यामुळें तो चमत्कदार वाटतो.

(३) दृष्टपूर्व वस्तु स्मरणींही प्रत्यक्षासम स्पष्ट दिसे

कॉलेजच्या पाठीमागील टेंकडीवर कवि नेहमीं संध्याकाळीं फिरावयास जात असे. तेथें 'पर्वतीकडे सन्मुख होउनि बाहेच्यावर उजव्या हाता' ला असणाऱ्या सिंहगडाकडे त्याचें नेहमीं लक्ष वेधलें जाई. म्हणूनच त्यावेळीं अनेकदां घडलेल्या निरीक्षणाच्या दृढ संस्कारानें, काव्यरचना प्रसंगींही तो सिंहगड कवीला प्रत्यक्ष नयनगोचर होत असल्यासारखा भास होत आहे असें सांगून कवीनें मोठ्या खुबीदार रीतीनें प्रस्तुत काव्याची सयुक्तिकता सूचित केली आहे.

(४) ४ थ्या आंकड्याच्या आरंभीं, सध्यांच्या अवनत स्थितींतही सिंहगडाकडे पाहाणाऱ्या मनुष्याच्या मनांत कोणत्या तऱ्हेचे स्वाभिमान-पोषक विचार उत्पन्न होतात, ते कवीनें पुढील ओळींत मार्मिक रीतीनें दिग्दर्शित केले आहेत—

**'श्रीमंताचा गरीब वंशज असला जरि तो अभिमानी**
**संग्रहिंचें तरि रत्न तयाच्या स्थिति पूर्वीची मनिं आणी**

सिंहगडावरील दगडाच्या राशी —

**'छे! दगड न ते मराठ्यांतले शौर्य धैर्य वा अभिमान**
**मूर्ताकारा घेउनि बसले परस्परांला चिकटोन!'**

भगवा झेंडा वर फडकत असतांनां दिसणारा सिंहगड आणि आतांचा बिनभगव्याझेंड्याचा सिंहगड यांच्यामधील हृदयविदारक भेद कवीनें पुढील करुणरम्य उपमेनें दाखविला आहे—

**'शिरावरिल तूं तुऱ्यावांचुनी आतां दिससी मोर जसा'**

तसेंच पुढें १० व्या आंकड्यांत बाले किल्यावर उंच वाढलेल्या गवतासंबंधीं कवीनें योजलेली पुढील उत्प्रेक्षा सहजस्फूर्त व

म्हणूनच हृदयस्पर्शी व करुणोत्कट अशी आहे.

'जणुं गवताच्या रूपें नांदे उदासीनता मूर्तिमती.'

माझ्या मतें या दोन कल्पना सर्व काव्यांतील सारभूत असून रा. नेरूरकर यांच्या सहजरम्य उत्कृष्ट कवित्वाच्या निदर्शक आहेत; व एकदां कानावर पडल्या कीं सदैव कानांत घुमत राहण्याजोग्या आहेत.

(६) वरच्या कल्पनांसारखीच, गुऱ्हाळाच्या "करकर" आवाजासंबंधीं कवीनें योजलेली पुढील रम्य व उदात्ताशी कल्पनांची जोडीही बहारीची तशीच फार आल्हाददायक आहे.

" 'करकर' नच ती, इक्षुदंड जे मधुर रसा पिळुं का ? 'साची
कुरकुर चाले हुकूमबंद्या सबलहि सहृदय चरकाची
शारदीय कौमुदी प्रभावचि असा अलौकिक कीं थोर
कर्णमधुर तेधवां भासदी कर्कश चरकाचा सूर"

(७) सिंहगडच्या दर्शनार्थ निघालेल्या मंडळींची थोडीशी जांवनिशी १ ल्या ओळीत देऊन नंतर –

'गोरे काळे सर्व मिळाले आले जमुनीयां थाटें'

या दुसऱ्या ओळीच्या पूर्वार्धातील सहजविनोद आणि 'आले जमुनीयां थाटें' या अ[illegible]ातील स्वभावोक्तिपूर्ण अशी सहज-वर्णन-छटा फार मजेदार साधली आहे.

(८) दर्शनार्थ निघालेल्या मंडळीच्या मनोवृत्तीचें व त्यांच्या मार्गक्रमणाच्या रीतीचें पुढील वर्णन यथोचित व मार्मिक आहे.

'गेल्यावारि कित्येक पिढ्या कुणि मानव मुळच्या स्वप्नांना
विविध कल्पना मनीं उभारित जातो धरूनी जो प्रेमा
त्याच प्रेमें प्रेरित होउनि सर्वे निघालों सर्व जण

लोकमान्य ८७१८

.... .... .... ....

'समान वय, सम विचार, इच्छा समान अमुचें मन वांछी
चालचालतां समान कालीं पडति पाउलें सकलांचीं
तत्पूर्वी कधिं नव्हता आला वेळ कवाइत शिकण्याचा
समकालीं तरि पडति पाउलें प्रसंग शिक्षक मनुजाचा'

(९) खंडकवासल्याच्या तलावावरील सायंकाळच्या सुश्रिशोभेचें वर्णनही थोडक्यांत चटकदार व मार्मिक वठलें आहे.

८ व्या आंकड्यांत आपले शिवकालीन पूर्वज सिंहगड कसे 'सहज सुखें' चढून जात आणि आतांचे लोक "कसे बसे तरि श्वास उश्वासे टाकीत, थबकत थबकत डोळे झांकीत" कसे चढतात; तसेंच, पूर्वीच्या लोकांची गड चढतानां कवच, खड्ग, बंदूक, भाला बरची वगैरेची सामग्री असे आणि तोच गड चढतानां प्रस्तुत सफरींतील लोकांची 'पोळपाट लाटणें' बटाटे, पीठ, मीठ मिरच्यांची सामग्री यांतील विरोध रा. नेरूरकर यांनीं खेदमिश्र विनोदानें चांगला दाखविला आहे.

(१०) कवि एकटाच खानकळ्याच्या उच्च पठारावर बसला असतां त्याच्या मनांत सहजगत्या जे उच्च व गंभीरादास नीतिमीमांसेचे विचार आले, ते कवीनें १२ व्या आंकड्यांत पुढीलप्रमाणें थोडक्यांत फार चांगले दर्शविले आहेत—

'उंचशाच त्या स्थला वरोनी दूरदूरचा देश दिसे
दुबळ्या अमुच्या दोनच मानवि नयनांला मग तरी कसें—
"सहस्र-नयना परमेशाला सहस्रपट जो उंच असे
सर्वहि दिसणें अशक्य न मुळीं" हें अमुच्या मनिं येत नसे!
हें अमुच्या मनिं येत असे तरि गुप्तपणानें अन्याया

करितों कसे कोणि न पाही म्हणुनी दुसऱ्या फसवाया?'
काव्याच्या शेवटीं, सद्यःस्थितींतल्या सिंहगडाला उद्देशून काढलेले करुणाजनक उद्गार, त्यांच्याचबरोबर, स्वजनोद्धारासंबंधीं

" दीन हिंदजन-रक्षण-काजा कळवळेल का देवसखा? "

असा कवीनें कळवळून स्वतःला केलेला प्रश्न, आणि त्या प्रश्नाचें स्वतः त्यानेंच दिलेलें-

'हो अजुनीही रक्षायाला उज्ज्वल ही तव परंपरा
असाच कुणि निपजेल सिंह हा असे भरंवसा मनीं खरा'

असें सोत्साह व आशापूर्ण उत्तर, याच्या योगानें काव्याची समाप्ति स्वाभाविक विचारौघयुक्त व परिणामकारक अशी झाली आहे.

सारांश प्रस्तुत काव्यांत एके ठिकाणीं ( पृष्ठ ५ ओळ १५ ) रा. नेरूरकर यांनीं-

' वदतों जे मी शद्ध तयांला स्वानुभवाची जोड असे'

असा जो उद्गार काढला आहे. त्याची यथार्थता या सर्व चिमुकल्या काव्यासंबंधानेंही सहृदय वाचकांस पटल्यावांचून राहणार नाहीं असें मला वाटतें. शेवटीं माझ्या मतें प्रस्तुत काव्यांतील ज्या दोन ओळींत रा. नेरूरकर यांनीं आपल्या काव्याची जणूं काय सर्व फलश्रुतीच सांगितली आहे, त्या दोन ओळी वाचकांस सादर करून हें दिग्दर्शन पुरें करितोः-

'हवाच खायाची असली तर ऐतिहासिक स्थळांविगी
वारकऱ्यांच्या प्रेमभक्तिनें योग्य असे करणें फेरी'

पुणें, अधिक श्रावण शु० ११ }
शके १८४५.

श्रीकृष्ण नीळकंठ चापेकर.

# सिंहगड-दर्शन काव्य.

गङ्गाप्रवाहज-चलज्जलसेक-रम्यम्
चन्द्रस्थिति-प्रगुणित-प्रभमुत्तमांगम् ।
भस्मानुलेपनविधेर्धवलायमानम्
आपादमस्तकमहम्प्रणतोऽस्मि शम्भुम् ॥१॥

[ १ ]

सज्ज करोनी जीवितनौका, ध्येयाचा ध्रुवताराही—
समोर धरिला, दर्यामधिं तरि कुणिकडेच ध्रुवता राही !
मेघ गडाडे वीज कडाडे सुटे प्रभंजन उठे जळ
हेलकावि नौकेस, गमे मग क्षणांत बघते अतां तळ !
असोत होड्या लहान किंवा तारुंतरांडी तिरकट तीं
दिशा चुकोनी ध्येय हुकोनी भलत्या बाजुस भरकटती !
परिस्थितीच्या फाजिल बादलबाजीमाजी खडा गडी
रडारडीची बात न नीटाचि धीट गांठितो पैलथडी
मार्ग आंखिला तोच राखिला होउं न देई कधिं ढील
कार्यकार ने तडीस कुशलचि कर्णधार तो तांडेल
असे जहाले खरे खलाशी त्यांच्या ज्या सफरा खास
त्याच जहाल्या मानवतेला मायभूमिचे इतिहास
भिन्न कालिं कुणि भिन्न खलाशी रक्षि राष्ट्रनौ शक्तीनें
प्रमुख त्यांत शिवराय शौर्यवान् गावें तद्यश भक्तीनें
शिवरायांनीं काबिज केला शिवनामाला शोभविता

करितों केसे कोणि न पाही म्हणुनी दुसऱ्या फसवाया?'

काव्याच्या शेवटीं, सद्यःस्थितींतल्या सिंहगडाला उद्देशून काढलेले करुणाजनक उद्गार, त्यांच्याचबरोबर, स्वजनोद्धारासंबंधी

" दीन हिंदजन–रक्षण–काजा कळवळेल का देवसखा? "

असा कवीनें कळवळून स्वतःला केलेला प्रश्न, आणि त्या प्रश्नाचें स्वतः त्यानेंच दिलेलें–

'हो अजुनीही रक्षायाला उज्वल ही तव परंपरा
असाच कुणि निपजेल सिंह हा असे भरंवसा मनीं खरा'

असें सोत्साह व आशापूर्ण उत्तर, याच्या योगानें काव्याची समाप्ति स्वाभाविक विचारौघयुक्त व परिणामकारक अशी झाली आहे.

सारांश प्रस्तुत काव्यांत एके ठिकाणीं ( पृष्ठ ५ ओळ १५ ) रा. नेरूरकर यांनीं–

'वदतों जे मी शद्ध तयांला स्वानुभवाची जोड असे'

असा जो उद्गार काढला आहे. त्याची यथार्थता या सर्व चिमुकल्या काव्यासंबंधानेंही सहृदय वाचकांस पटल्यावांचून राहणार नाहीं असें मला वाटतें. शेवटीं माझ्या मतें प्रस्तुत काव्यांतील ज्या दोन ओळींत रा. नेरूरकर यांनीं आपल्या काव्याची जणुं काय सर्व फलश्रुतीच सांगितली आहे, त्या दोन ओळी वाचकांस सादर करून हें दिग्दर्शन पुरें करितोंः–

'हवाच खायाची असली तर ऐतिहासिक स्थळांवरी
वारकऱ्यांच्या प्रेमभक्तिनें योग्य असे करणें फेरी'

पुणें, अधिक श्रावण शु० ११<br>शके १८४५.

श्रीकृष्ण नीळकंठ चापेकर.

अ.क्र. ७९८

# सिंहगड-दर्शन काव्य.

गङ्गाप्रवाहज-चलज्जलसेक-रम्यम्
चन्द्रस्थिति-प्रगुणित-प्रभमुत्तमांगम् ।
भस्मानुलेपनविधेर्धवलायमानम्
आपादमस्तकमहम्प्रणतोऽस्मिशम्भुम् ॥१॥

[ १ ]

सज्ज करोनी जीवितनौका, ध्येयाचा ध्रुवताराही—
समोर धरिला, दर्यामधिं तरि कुणिकडेच ध्रुवता राही !
मेघ गडाडे वीज कडाडे सुटे प्रभंजन उठे जळ
हेलकावि नौकेस, गमे मग क्षणांत बघते अतां तळ !
असोत होड्या लहान किंवा तारुंतरांडी तिरकट तीं
दिशा चुकोनी ध्येय हुकोनी भलत्या बाजुस भरकटती !
परिस्थितीच्या फाजिल बादलबाजीमाजी खडा गडी
रडारडीची बात न नीटचि धीट गांठितो पैलथडी
मार्ग आंखिला तोच राखिला होउं न देई कधिं ढील
कार्यकार ने तडीस कुशलचि कर्णधार तो तांडेल
असे जहाले खरे खलाशी त्यांच्या ज्या सफरा खास
त्याच जहाल्या मानवतेला मायभूमिचे इतिहास
भिन्न कालिं कुणि भिन्न खलाशी रक्षि राष्ट्रनौ शक्तीनें
प्रमुख त्यांत शिवराय शौर्यवान् गावें तद्यश भक्तीनें
शिवरायांनीं काबिज केला शिवनामाला शोभविता

दुर्गराज जो सिंहगड मला तो कविला हो मोहविता
लोभवि तानाजीयश त्यापरि ह्मणुनि पाहिला सिंहगड
ते दिन गेले, स्मृतिनें आले विचार ते वदतों उघड

[ २ ]

दिवस सुखद जे गतायुमधले गोड तयांचें संस्मरण
कालावधिसह अधिक सुखावह होइ सहृदया आमरण
तात-अंबिका-सहवासांतिल बाल्य यौवनीं सुख देतें
हारवि यौवन-विलास संस्मृति वार्धक्याच्या विपदेतें
प्रवयामधिं परतूनि पाहतां स्मृति-नेत्रांनीं माघारी
विद्यार्जन-काल-स्थिति दिसते शतगुण रम्य मनोहारी–
शिक्षणसाधन करितां होते प्रगल्भ मति वाद[१]-नयांनीं,
लेखन, वाचन, गान, सुखाशन-पान-शयन, वादन, यांनीं–
जें सुख लाभे अनुभवितां नच दारुण चिंतेचे चटके
आतां कुठलें? आतां केवळ घेणें स्मृति-वर्णन घुटके!

[ ३ ]

अस्तमनीं कुणि सहल कराया विहरत गात सुखांत जईं
जाति छात्रगण चोहोंकडुनी जमुनि चढत वरि फिरत तईं–
फर्ग्युसनावसथाच्या[२] पश्चिमभागिं टेंकडी लांब उभी
शुभ्रवसनयुत छात्रगणांसह दिसते स्वर्गगाच नभीं!
तेथिल एका शिलातलावरि बसुनि पाहतां सभोंवती
भिन्न भिन्न हृत्सागरिं बहुविध कल्पनोर्मिका उठावती

१ डिबेटिंग्स वगैरे. २ फर्ग्युसन कॉलेज-रेसिडेन्सीच्या.

पर्वतीकडे सन्मुख होउनि बसल्यावरि उजव्या हाता
दिसतो गिरि तो धरि गगना जणुं उभवुनियां अपुला माथा
उंच तयाच्या मस्तकावरी सिंहगडाचा मुकुट दिसे
तत्क्षणिं तो प्रथमावलोकनीं प्रेक्षकनयनां वेधितसे
दृष्टपूर्व वस्तु स्मरणेंही प्रत्यक्षासम स्पष्ट दिसे
टेंकडिवरुनी सिंहगड मला अतांच दिसतो जणुं भासे
रोज इथुनि जरि परस्परांतें बघतों तरि नच तृप्ति घडे
बघ सिंहगडा! पहा मजकडे मीहि पाहतों तुझ्याकडे!

[ ४ ]

श्रीमंताचा गरीब वंशज असला जरि तो अभिमानी
संग्रहिचें तरि रत्न तयाच्या स्थिति पूर्वींची मनिं आणी
सिंहगडा बा! तुजसम रत्नें हीं दगडांच्या राशींचीं
शिवरायाच्या दौलतखान्यांतिल ज्यां भीति न नाशाची
छे! दगड न ते—मराठ्यांतले शौर्य धैर्य वा अभिमान
मूर्ताकारा घेउनि बसले परस्परांला चिकटोन!
त्या कालींचे आतांचेही मोहर पुतळ्यादिक होन
तुजसम रत्नावरुनि वाटतें टाकावे ओंवाळून!
असेल दिसला भगवा झेंडा फडकत तुजवरि उडत कसा?
शिरावरिल तूं तुऱ्यावांचुनी आतां दिससी मोर जसा
जीन-खोगिरावांचुनि घोडा शिलाच शय्येवांचोनी
मीठ-मसाल्यावांचुनि भाकर,—ही तेव्हांची राहाणी!
प्रेम नाटकीं शृंगाराविण वस्त्र बढाईवांचोनी

अन्यायाविण शक्ति वेंचणें,–ही तेव्हांची राहाणी !
निर्दयतेविण हुकमत, तैशी हिकमत कपटावांचोनी
निर्मत्सर हिंमत मर्दानी,–ही तेव्हांची राहाणी !
स्वराज्यवर्धन स्वधर्मरक्षण हेच विषय जन-चिंतेचे
जीवित वित्त न, स्वराष्ट्र हेंचि स्थान तयांच्या ममतेचें
लांब लांब गप्पा ध्येयाच्या प्रसंग येतां पद मागें
तें न ठाउकें कर्तव्याच्या हांकेला नित्यहि जागे
ध्येयसाधनां करितां येइल प्राणांवरि जरि बेत कधीं
" मजवरि यावी पाळी " चुरशी हींच तयांच्या मनामधीं
असल्या वीरांनीं तव केलें तूंहि तयांचें सुरक्षण
अतां पारखे झालों उभयहि लाज वाटते तरि क्षण
नवीन मोहिम सुरू कराया गुप्त खलबतांचा बेत
विजय मिळवुनी आल्यावरि वा पोवाड्यांचा संकेत
असे चालला गडामधीं तों तटावरुनि या बाजूच्या
धीरें पणें वा अधीरतेनें एके दिनिं त्या कालींच्या–
फिरत पहारेकरी मराठा बघता जरि का येथवरी
वन्य पशूंनीं व्याप्त भयंकर दिसतें जंगल तया तरी!
भाला बरची कट्यार त्यांची पट्टा कुस्ती बोंथाटी
दूरच तीं करिं असुच्या नकली पॉलिश केलेली काठी!
अडीच इंचांच्यावरि लवभरि परिघ तिचा जरि कधिं जाई

१२ खलबतें चाललीं असल्यास सावकाश व पोवाड्याचा बेत असल्या तर उत्साहामुळें जलदीनें.

५१९८०२



लिलिपुटच्या तरि नागरिकांसम शस्त्र भयंकर तें होई!
ते मर्दानी खेळ अहा! व्यायामसाधनें तीं गेलीं
हवा खावया फिरतां 'खाउनि हवा' च बसण्याची पाळी!
हवाच खायाची असली तर ऐतिहासिक स्थळांवरी
वारकऱ्यांच्या प्रेमभक्तिनें योग्य असे करणें फेरी
चौभिंतींच्या आंतिल कोंदट हवेंतल्या त्या मेंदूला
पर्वतशृंगांवरिल गडांची मिळो हवा स्पर्शायाला
तीच भूमि, तें आकाशहि, ते वारे, त्याच गिरींवरुनी
स्वातंत्र्याच्या गात गायना विहरति परिसा जा अजुनी!
नसांतल्या रक्तांत मिसळुनी सळसळलें यत्---ध्वननानें—
वारें शौर्याचें तीं वेष्टिति अजुनि गडां वातावरणें
जा! दुर्गाच्या प्राकारांवरि उभे रहा मग निमिषांत
तुह्मांस नेइल हवा तेथली इतिहासाच्या कालांत
स्वातंत्र्याचें स्वैर विहरतें वारें तें तेथेंच तसें
वदतों जे मी शब्द तयांला स्वानुभवाची जोड असे

[ ५ ]

तोच दिवस तो--शुद्ध कार्तिकी दशमी त्या दिवशीं होती
सिंहगडाला पहावयाची आवडही मनिं बहु मोठी
पुण्यदिन महाएकादशिचा पुण्याचरणीं लावाया
तानाजीरण—पुण्यक्षेत्रीं सिंहगडीं सजलों जाया
सांवर्डेकर भिडे राजुरीकर कुळकर्णी घोपाटे
गोरे काळे सर्व मिळाले आले जमुनीयां थाटें

मूल्य ८/८

गेल्यावरि कित्येक पिढ्या कुणि मानव मुळच्या स्वग्रामा
विविध कल्पना मनीं उभारित जातो धरुनी जो प्रेमा
त्याच प्रेमें प्रेरित होउनि सर्वं निघालों सर्व जण
खडकवासला तलाव बघुनी सायंकाळीं रमे मन
कुसुमावलिंचे कांठ जयाला हरिद्वर्णशा वसनाला
लेवुनि, वेणी भ्रमरपंक्तिची घालुनि, शरदश्री बाला—
वनांवनांतुनि विहरत होती शीत तियेचें उत्-श्वसित
तडागपृष्ठीं तोचि मंद जणुं समीर लहरी उपजवित
रवितेजाला अस्त जहाला, गिरि-दर्‍यांतुनी डोकावी-
तिमिर बापुडा, तोंच तयाला हिमकर वरुनी सडकावी!
कृष्णपक्षिच्या अवनतिमध्यें तिमिर निशेमधिं राज्य करी
धरणीवर या, कृष्णकृतींला देई अवसर कितीतरी
चंद्रसूर्य हे दोनच किंवा अंशर्च त्यांचे हेच खरे
राज्य कराया धरणीवर या लायक राजे होति बरे
झाली अपकीर्ती तरि पूर्विल वैभवलोभ तमा न सुटे
दरी गुहांतुन इकडे तिकडे पाहत पाहत तिमिर उठे
शिवमस्तकिंचा हिमांशुमाली सत्ताधारी धरणीचा
पळवी तिमिरा दिशांदिशांला आश्रय करि जो रजनीचा
राजपथाच्या दोन्ही बाजुंस वृक्षांची जी रांग असे
त्यांचा आश्रय करुनि बिचारा तिमिर तेधवां लपुनि बसे!
समानवय, समविचार, इच्छा समान अमुचें मन वांछी

१ हा शब्द उच्चारतांना "वंशज" असें म्हटल्यासारखें वाटतें!

चाल चालतां समान कालीं पडति पाउलें सकलांचीं
तत्पूर्वीं कधिं नव्हता आला वेळ कवाइत शिकण्याचा
समकालीं तरि पडति पाउलें प्रसंग शिक्षक मनुजाचा.
पदनादाच्या तालावर त्या समसुरांत गानालाप
तालिम नव्हती कधीं घेतली तरि सुटती आपोआप
चालचालतां तरुरांगांची घनछाया पथिं ये जेव्हां
वदनीं "हरहर महादेव" ही निघे गर्जना सम तेव्हां
दूरदूरच्या अंतरावरी गुऱ्हाळ चाले, कर्णपथीं—
कर्कश करकर चरकाचा ये सूर चालतां राजपथीं
'करकर' नच ती— "इक्षुदंड जे मधुर तयां पिळुं कां?" साची
कुरकुर चाले हुकूमबंद्या सबलहि सहृदय चरकाची!
शारदीय कौमुदी—प्रभावाचि असा अलौकिक कीं थोर
कर्णमधुर तेधवां भासवी कर्कश चरकाचा सूर!
दृष्टि गडावरि, पद पदावरी, चालत असतां तालांत
चालचालतां रात्रिं पोंचलों गडाजवळिच्या गांवांत

[ ६ ]

तोंच डफावर थाप ऐकिली सूर तुणतुण्याचा आला
शृंगारिक लावण्यांत लोकीं खेळ तमाशा चालविला!
इथें दोनशें सत्तर वर्षांपूर्वि डफावर थाप पडे
तेव्हां होते जात गाइले वीररसाचे पोवाडे
शत्रूच्या छातीवर बसले लढाईंत जे वीर गडी
पोवाड्यांतिल आवेशाला स्फुरले पिढ्नी घडी घडी

ते पोवाडे, शाहीरहि ते, डफ ते, संबळ ते मेळ
गेली ती जशि वेळ तसेची गेले सारे ते खेळ
शृंगारिक वा बीभत्स अशा लावण्यांचि लज्जत खास
वास मनामधिं करिते. झाला मर्दुमकीला संन्यास!
'तोतारामा' सम कुणि गोंधळि येता या स्थळिं आज जर
डांग समेळीं ठोकुनि ह्मणता– "थुः तुमच्या जिनगानिवर!"

[ ७ ]

अशा विचारीं निद्रा लागे मग प्रभातीं उठुनि पुढें
मुखक्षालना करुनि निघालों समोर केसरिगडाकडे
मागें पुढती डावी--उजवीकडे सभोंती घनदाट
ताठ उभे गिरिराज मधूनी वळत जात अमुची वाट
त्यांतिल पर्वत उजवीकडचा मान करुनि वरि राहात
सिंहगडाचा मुकुट मस्तकीं ह्मणुनि तयाचा हा थाट!
प्रभातिंचा तो काल सुमंगल लाल बिंब रविचें येत
देइ मुलामा सोन्याचा वरि फिरवुनियां अपुला हात
आजुबाजुचीं सर्व लपालीं नक्षत्रें जरि गगनांत
गडावरिल तरि वेळ काढिती हळु रेंगाळत राहात
बाळ लाडके सृष्टीचे खग परमेशाचे ते भाट
ईशा नमुनी सिंहगडाला वंदन पहिलें गातात
दाट अकृत्रिम गान--रसाचे अलोट वाहाती लोट
गगनाला जणुं भेटायाला जाति सरळ तरुवर सोट
"चौथाई–सरदेशमुखी" ची संवय जयाला तो थेट

गडावरुनि ये पवन तरुवरां लववुनियां मुजरा घेत
प्रकार सारा पाहुनि ऐसा नयनीं, अमुचेही हात—
जुळले, नकळे कुणास केलें वंदन वरती पाहात!

[ ८ ]

पूर्वी अमुचे पूर्वज चढले लीलेनें जो सहज सुखें
कोशाहुनि तो उंच गडाचा चढाव चढतां जीव थके
प्रहरावरि दिन ये तों आम्ही श्वास उसासे टाकीत
कसे बसे तरि थबकत थबकत चढलों डोळे झांकीत!
कवच, खड्ग, बंदूक घेउनी भाला बरची जे लढले
पोळपाट लाटणें बटाटे पीठ मीठ घेउनि चढले—
वंशज त्यांचे त्याच गडावरि! एकादशिच्या आहारा
करण्यासाठीं सामग्रीचा खटापोट होता सारा!
दिधली "हरहर महादेव!" ही गर्जनाच दरवाजांत
शिरोभूषणें करिं घेउनियां उभारुनी वरती हात.

[ ९ ]

सिंहगडाचा त्या कालींचा राहत सिंह तिथें होता
ऐसें कळतां त्वरित निघालों मधिं कोठेंही न थांबतां
दर्शन झालें अंतर धालें मानसिं ठरलें सर्वांचे
कीं दाजीसाहेब खऱ्यांचे बंगल्यांत उतरायाचें
वीरश्रीचें पाणि चढे जेथील पिऊनीयां पाणी
टांक्यांमधिं त्या यथेच्छ न्हालों पोहुनियां दों हातांनीं
स्नान जहालें संध्यावंदन फराळ सारें आटोपे

लोपे श्रमही गड पाहाया धोपे नच कुणि वा थोपे
उड्याच मारित एका पुढती एक निघालों पुढें पुढें
बाले किल्ल्यावरि त्याक्षणीं एकामागुनि एक चढे

[ १० ]

त्या बाले किल्ल्यावर होतें गवत वाढलें उंच अती
जणुं गवताच्या रूपीं नांदे उदासीनता मूर्तिमती
उतरुनि तेथुनि तटावरुनि मग फिरत चाललों तेथवरी
तानाजी निशिं जेथुनि चढला वरि, ती होती जेथ दरी
घट्ट जया स्थानास बिलगली तानाजीची यशवंती
आधुनिक महाराष्ट्र कवींची गाई जें स्थल रसवंती
तानाजी सर करण्या किल्ला जेथुनि पूर्वी आकांक्षी
तो झुंजार बुरूज पाहिला त्याच्या शौर्याचा साक्षी
उदयभान बेइमान ज्या अभिमान न अपुल्या रक्ताचा
स्वराज्योद्यमा जाणि कुकर्मि न आणित्राणिच्या वरुताचा
त्याचें थडगें पाहुनि जातां पुढेंच विमल यशोराशी
दिसे समाधी तानाजीची रणगाजींची जी काशी
उदयभानुला तानाजीशीं प्रसंग लढण्या नच येता
दर्शन दूरच राहो, त्याचें नांव कोण तरि मग घेता?
गतकालासम आजहि विग्रह सुजनां श्रेष्ठांशीं करुनी
पहा चिरस्मरणीय जहाले क्षुद्र दुष्टही या भुवनीं!
टांक्यांतिल जलिं तानाजीचें रक्त पडे जें लाल अती
मत्स्य तेथिंचे रक्त वर्ण तो धारण अजुनीही करिती

हृदयीं धरुनी स्वपति–पादुका पुण्यशालिनी जाइ सती
मनोभावना प्रदीप्त करुनी तें स्थल करितें गुंग मती

[ ११ ]

सोडुनि सकलां एकटाच मग खानकड्यावरती बैसें
हिमाद्रिच्या कैलासशिखरिं जणुं भासे चढलों मी ऐसें
सभोंवारचे उंच उंच गिरि खुजेच दिसले मज तेव्हां
अर्ध्यास्वर्गीं चढलों वाटे खालिं पाहिलें मी जेव्हां
" शौर्याची तव मूस तनु इथें, फिरतो आत्मा तरी कुठें?
धन्य धन्य तूं तानाजी! " मम कंठीं ऐसा ध्वनी उठे
" मम आत्मा शिवविभूत्यंशही असे कुठें–तुज ही भ्रांती
वसती दोन्ही पाहिलास तूं त्याच आजच्या सिंहांतीं! "
तानाजिसमाधिस्थलागत प्रतिध्वनी हा परिसोनी--
ध्वनीस माझ्या उत्तर रूपीं, बसलों होउनि मी मौनी

[ १२ ]

उंचशाच त्या स्थलावरोनी दूरदूरचा देश दिसे
दुबळ्या अमुच्या दोनच मानवि नयनांला मग तरी कसें–
" सहस्रनयना परमेशाला सहस्र रट जो उंच असे
सर्वहि दिसणें अशक्य न मुळीं " हें अमुच्या मनिं येत नसे?
हें अमुच्या मनिं येत असे तरि गुप्तपणानें अन्याया–
करितों कैसे कोणि न पाही म्हणुनी दुसऱ्या फसवाया?
अशा विचारीं मग्न असें तों हांक ऐकिली मित्रांची
होई मसलत परत फिराया स्वस्थानीं सर्वत्रांची

गेल्यावरि जवळील पाहिली राजारामाची छत्री
शिवतनया त्या वंदन केलें आदरपूर्वक सर्वत्रीं
स्वस्थ मनानें सायंसंध्या सारुनि सकलहि सुहृदांनीं
सिंहा तत्कालीन पाहुनी ऐकिलि श्रेयस्कर वाणी

[ १३ ]

सिंहगडाचा सिंह शिवाजी तो पहिल्या अम्मदानीचा
नामकरण जो प्रथमचि करि त्या वाढवि महिमा स्थानींचा
बाजिराव माधवादि झाले सिंह नाम तें रक्षाया
दुसऱ्या अमदानींत शूर नर पूर्वज महिमा लक्षाया
करुनि नित्य केसरी--गर्जना स्वत्व स्वजनां शिकवि खरा
तिसऱ्या अमदानींत होउनी राखी पूर्वज परंपरा
तो गेला आजि सिंह टिळक हा हा! हतदैवा! सिंहगडा!
विफल नाम तव होय गड्या रे! आतां तूं पडसी उघडा!
दीन हिंद-जन--रक्षण-काजा कळवळेल का देवसखा?
सिंहगडावरि वीरश्रीची सिंहगर्जना उठेल का?

*          *          *          *

हो! अजुनीही रक्षायाला उज्ज्वल ही तव परंपरा
असाच कुणि निपजेल सिंह हा असे भरंवसा मनीं खरा.

REFBK-0019492
REFBK-0019492
१२०८२